


म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का.वा
दा. क्र. ९४५४९

IRBK-0115951
IRBK-0115951

# झाशीची राणी

— प्रा. म. वि. फाटक

ह० क्र० ९४५४७
३०१३१०४
वा० ०१

• नवसाक्षर प्रौढासाठी •

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३०७५२
विभाग वाच. ०११५४४
क्रमांक २३३२
नों. दि. १०/७/५९
वाचनालय शाखा.

# झाशीची राणी

• लेखक
प्रा. म. वि. फाटक
एम्. ए., एम्. ड्.

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
वा. क्र. ९४५४७ नों दि. ३०१३१०४
वि. वा. ०१

• किंमत
३० नवे पैसे

• द्वितीय श्रेणी

IRBK-0115951
IRBK-0115951

विद्या प्रकाशन
४५० बुधवार पेठ, पुणें २.

●● प्र का श क ●●
व्ही. आर. शिं ग रे,
वि द्या   का श न,
४५० बुधवार पेठ, पुणें २.

●● मु द्र क ●●
व्ही. आर. शिं ग रे,
स र्वो द य   मु द्र णा ल य,
४५० बुधवार पेठ, पुणें २.

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
१
राष्ट्रीय ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 3094
क्रमांक 2332
वाचनालय शाखा.

# झाशीची राणी

ते थंडीचे दिवस होते.
पौष महिना चालू होता.
शाळूची कापणी झाली होती.
गावचे शेतकरी पिकाच्या भोवती हिंडत होते.
शेत पिकल्यामुळे लोकाना आनंद वाटत होता.
पिकाची राखण चालू होती.
रात्रीची वेळ झाली.
जागले लोकानी शेकोटी पेटवली.
ते तिच्याभोवती बसले.
एकाने लावणी गुणगुणण्यास आरंभ केला.

इष्काची नार समशेर ।
रंगमहाली दाविते धार ।
बनते शिरजोर । कापिते मान पुरुषाची
मदन तरवार ॥....

रात्रीची शाळा संपवून हरबा परतत होता.
त्याने ही लावणी ऐकली.

त्याला वाईट वाटले.
तो विचार करू लागला,
" बायका केवळ चैनीसाठी आहेत काय ? "
हरबाने पुस्तके वाचली होती.
मराठ्यांच्या पुष्कळ कथा वाचल्या होत्या.
तो त्या शेकोटीजवळ आला.
आणि त्या जागले लोकाना म्हणाला,
" दोस्त हो, आपली अस्तुरी अशी निंदू नका.
ती नुसती मदनाची तरवार नाही.
ती वेळप्रसंगी मोठी पराक्रमी असते.
माहीत आहे का ? सांगू का तुम्हाला ? "

जमलेल्या सर्व लोकानी वर बघितले.
आणि हरबाच्या भोवती एकच गिल्ला केला.
सर्वजण म्हणाले,
" हरबा, सांगा, सांगा आम्हाला. "
आणि हरबाने गोष्ट सांगायला आरंभ केला.

२

दोस्त हो, शंभर वर्षे होत आली या गोष्टीला !
उत्तर हिंदुस्थानात झाशी नावाचे शहर आहे.

तेथे पूर्वी मोठे राज्य होते.
तेथील राजाचे नाव होते गंगाधरपंत नेवाळकर.
आणि राणीचे नाव होते लक्ष्मीबाई.
राणीला एक मुलगा झाला.
पण लहानपणीच तो वारला.
राजाराणी वरवर दिसत सुखी.
पण मनात होते फार कष्टी.

एवढे मोठे राज्य पण मूलबाळ नाही.
गंगाधरपंतांचे वय झाले.
आणि त्यात ते झाले आजारी.
त्यानी ठरविले की दत्तक घ्यावा.
इंग्रज सरकारची परवानगी हवी होती.
सरकारकडे दत्तक घेण्याबद्दल एक अर्ज केला.
पण सरकारने परवानगी नाकारली.

गंगाधरपंतानी पुन्हा विनंती केली.
आणि एक मुलगा निवडला.
त्याला दत्तक म्हणून मांडीवर घेतला.
फार दिवस लोटले नाहीत,
तोच गंगाधरपंत आजारी पडले.
व एक दिवस ते वारले.

गरीब बिचारी राणी लक्ष्मीबाई !
पण ती होती धीराची.
तिने मुलाला मांडीवर घेतले.
आणि झाशीचा राज्यकारभार केला.
लोकाना न्याय दिला.
गोरगरीबाना मदत केली.
फौज शिकवून तयार केली.
लोक आनंदाने म्हणाले,
" राणी म्हणजे देवीचा अवतार !"

पण इंग्रजाना हे पाहवले नाही.
त्यानी राणीला हुकूम पाठविला,
" दत्तक आम्हाला मंजूर नाही.
तुमचे राज्य खालसा केले आहे.
तुम्ही पेन्शन घ्या.
आणि झाशी आम्हाला देऊन टाका. "
सरकारचा हुकूम राणीने वाचला.
राणीला राग आला.
तिने हुकुमाचा कागद भिरकावून दिला.
राणी म्हणाली,
" मेरी झासी नही दूंगी ! "

## ३

याच वेळी देशात बंड सुरू झाले.
पण हे खरोखर बंड नव्हते.
इंग्रजाविरुद्ध ती लढाई होती.
सैन्यातील शिपाई इंग्रजावर उलटले होते.
पेशव्यांचे राज्य गेलेले होते.
नानासाहेब पेशवे या शिपायाना मिळाले.
तात्या टोपे हा नानासाहेबांचा मित्र.
तात्या होता मोठा शूर.
तो शिपायाना मिळाला.
शिपायानी तात्याला केले सेनापती.
आणि झाली लढाईला सुरुवात.
इंग्रज होते दिल्ली, कानपूर व मीरत येथे.
तेथे लढाईला जोर आला.
शिपायानी इंग्रजांचा प्रथम पराभव केला.
नंतर कांही बंडवाले आले झाशीत.
राणी त्याना म्हणाली,
" या रे या, माझ्या झाशीत या.
देशाला स्वतंत्र करणारे शिपाई हो,
तुम्ही झाशीत या.

माझी झाशी तुमची आहे.
माझी मदत तुम्हाला.."

४

इंग्रजांचा कावा राणीने ओळखला.
तिने तात्या टोपेला निरोप धाडला.
आणि या लढाईत उडी घेतली.
इंग्रजाना राणीचे वागणे आवडले नाही.
त्यानी फौज गोळा केली.
झाशीच्या तटाभोवती वेढा घातला.
कॅप्टन ह्यू रोज इंग्रजी फौजेचा अधिकारी होता.
त्याने हुकूम दिला,
" झाशीवर हल्ला करा.
आणि राणीला पकडून आणा."

इंग्रजांच्या तोफांचे गोळे झाशीवर पडू लागले.
पण राणी घाबरली नाही.
तिने सैन्याला हुरूप आणून दिला.
तिचे कांही सैनिक तटावरून इंग्रजावर बंदुका उडवू लागले.
कांही धनुष्यावरून बाण मारू लागले.

स्वतः राणीने पुरुषाचा वेष केला.
अंगात पांढरा अंगरखा घातला.
डोक्यावर पांढरा फेटा बांधला.
हातात तरवार घेतली.
घोड्यावर बसली.
तिच्या सानकाना धीर आला.
पण इंग्रजांचा तोफखाना होता भक्कम.
त्या तोफांचे गोळे झाशी शहरात पडत.
लोक जखमा होत.
त्या तोफांचे गोळे झाशीच्या तटावर पडत.
आणि तटाला खिंडार पडे.
खिंडारातून इंग्रज शिपाई आत शिरू लागत.
पण राणी तरवार घेऊन त्यांच्या अंगावर जाई.
राणीच्या पाठोपाठ तिचे सैनिक जात.
आणि लढाईला अवसान चढे.
असे बरेच दिवस गेले.
झाशीत अन्नाचा तुटवडा पडला.
राणीचे कांही सैनिक मारले गेले.
किल्ल्याच्या तटाला अनेक खिंडारे पडली.
बाहेरून मदत मिळेनाशी झाली.
राणीचा कोंडमारा झाला.

इंग्रजाना वाटले,
" आता राणी हरणार.
तिला आता पकडायचे.
सकाळी मोठा हल्ला करायचा.
आणि झाशी जिंकायची."
इंग्रजानी लागोपाठ हल्ले चढवले,
पण राणी खरी मर्द.
तिने धीर सोडला नाही.


५

रात्रीची वेळ होती.
सगळीकडे अंधार पसरला होता.
राणीने निवडक सैनिक बरोबर घेतले.
ती घोड्यावर स्वार झाली.
मुलाला पाठीशी बांधून घेतले.
हातात तरवार घेतली.

आणि झाशीच्या तटावरून खाली घोडा फेकला.
तिच्या सैनिकानी तिच्या पाठोपाठ घोडे घातले.
तिने रात्रीच्या अंधारात इंग्रजी फौजेला चकवले.
आणि ती ग्वाल्हेरकडे निघून गेली.

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.

सकाळ झाली.
राणी झाशीतून निघून गेली.
हे कॅप्टन रोजला कळले.



त्याला राग आला.
त्याने आपले घोडेस्वार घेतले.
आणि त्याने राणीचा पाठलाग चालविला.
राणीने भरधाव घोडा चालविला.
आणि ती काल्पीला पोहोचली.
तेथे इंग्रजांची फौज आडवी आली.
राणीने तरवार चालविली.

ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 30.7.62
विभाग
क्रमांक 2-332
नों. दि- 5-5-69
वाचनालय शाखा

तिचे सैनिक इंग्रजावर तुटून पडले.
निकराची लढाई झाली.
इंग्रजांचे सैनिक मरू लागले.
आणि कांही इंग्रज सैन्य पळून गेले.
राणीने ही लढाई जिंकली.

ती झपाट्याने ग्वाल्हेरकडे गेली.
ग्वाल्हेरला नानासाहेब पेशव्यांचे सैन्य होते.
ग्वाल्हेरचा किल्ला मजबूत होता.
पण ग्वाल्हेरचा राजा किल्ल्यात लपला होता.
तो इंग्रजाना घाबरला होता.
त्याने राणीला किल्ल्यात घेतले नाही.
राणीवर मोठेच संकट कोसळले.
ग्वाल्हेरच्या जवळच मुरादला इंग्रज सैन्य होते.
त्यामुळे तिला पुढे जाता येईना.
मागे कॅप्टन रोज पाठलाग करीत येत होता.
त्यामुळे तिला मागे जाता येईना.
तात्या टोपे मदतीला येणार होता.
पण आता वेळ राहिला नव्हता.
शत्रु दोन्ही बाजूनी जवळ येत होता.
राणी ग्वाल्हेरातच अडकून पडली.

## ६

राणीने पाठीला बांधलेला मुलगा सोडला.
एका विश्वासू नोकराजवळ दिला.
राणी त्याला म्हणाली, " हा माझा मुलगा.
हा मोठेपणी झाशीचा राजा होईल.
याला येथून दूर घेऊन जा.
कोठे तरी संभाळून ठेवा. "

नोकराने मुलाला घेतले. तो नोकर निघून गेला.
राणीची एक काळजी दूर झाली.
आता पुढे कसे तोंड द्यायचे ?
राणी विचार करू लागली.
इतक्यात कॅप्टन रोजचे सैन्य ग्वाल्हेरला पोचले.
त्या सैन्याने राणीचा शोध चालविला.
ग्वाल्हेर शहरातच त्याची गाठ पडली.
राणीने हातात तरवार घेतली.
आणि ती इंग्रज सैन्यावर तुटून पडली.
घोड्याला घोडा भिडला.
तरवारीला तरवार घासू लागली.
लक्ष्मीबाईने अपूर्व पराक्रम केला.
ती विजेप्रमाणे तरवार फिरवीत होती.

आणि इंग्रज सैनिकाना मारीत होती.
इंग्रज अधिकारी इतके पराक्रमी,



पण ते राणीचा पराक्रम बघून थक्क झाले.
राणीने ग्वाल्हेरच्या बाहेर जाण्याचा प्रयत्न केला.
पण इंग्रजांचा वेढा तिच्या भोवती होता.
राणीचे शरीर रक्तबंबाळ झाले.
तरी राणी लढतच होती.
देशाचे रक्षण तिला करायचे होते.
इंग्रजांचे राज्य तिला झुगारायचे होते.
झाशीचे स्वातंत्र्य तिला टिकवायचे होते.
झाशीची राणी म्हणजे रणदेवताच !

७

इतक्यात कोठून तरी एक वार तिला लागला.
कोठून तरी एक बंदुकीची गोळी आली.
ती राणीच्या अंगात घुसली.
राणी थकून गेली.
ती घोड्यावरून घसरली.
तिच्या नोकराने तिला सावरले.
पण ती आता वाचणार नव्हती.
जगण्याची आशा आता उरली नव्हती.

ती म्हणाली,
" मला शेवटपर्यंत लढू द्या. मेरी झाशी नही दूंगी !
मी मेले तरी हरकत नाही.
पण माझे प्रेत इंग्रजांच्या हाती देऊ नका."
तिला अधिक बोलवेना.

समोर लढाइ चालूच होती.
शेजारी गवताची एक गंजी होती.
ती एकदम पेटवली गेली.
आणि झाशीच्या राणीला तेथे ठेवण्यात आले.
इंग्रजाना झाशीची राणी मिळाली नाही.
ती इंग्रजाना मारता मारता मेली.

अनुक्रम 30962
विभाग 2332
ऑ. दि.
वाचनालय

आणि मरता मरता अमर झाली !
अशी आहे ही मर्दानी स्त्री !

८

अनेक वर्षे झाली.
ग्वाल्हेर शहरात राणीचा पुतळा आहे.
लक्ष्मीबाई घोड्यावर स्वार झालेली आहे.
लक्ष्मीबाईचे ते स्मारक आहे.
देशाच्या स्वातंत्र्याचा तो इतिहास आहे.
भारतीय स्त्रीच्या पराक्रमाची ती साक्ष आहे.
आणि म्हणूनच त्या पुतळ्याखाली राजकवि तांबे यांच्या कवितेच्या ओळी आहेत.

" रे हिंदबांधवा ! थांब या स्थळी
अश्रु दोन ढाळी !
ही पराक्रमाची ज्योत मावळे.
इथे झाशीवाली "

हरबाची गोष्ट संपली.
ऐकणाऱ्या लोकांच्या डोळ्यात आसवं आलो.
ते म्हणाले,
" धन्य ! धन्य आहे झाशीच्या राणीची !"

IRBK-0115951
IRBK-0115951
३०९५२ वा. वा. २३३२ ८/८/८१
म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ९५५४१ नों. दि.